|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

**प्रवेश पात्रता विभाग**

जा.क्र.कबचौउमवि/६/प्र.पा./युजीपीजी/ ६६ /२०२० दिनांक :- १५ सप्टेंबर,२०२०

**प्रति,**

१) कबचौ उमविशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे, मा.प्राचार्य / मान्यता प्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक

२) विद्यापीठाचे सर्व शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक / मा.विभागांचे प्रमुख

**विषय:-** महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेतंर्गत पदवी आणि पदव्युत्तर (बी.बी.ए.,बी.सी.ए.,बी.एम.एस, बी.एम.एस.(ई-कॉमर्स), एम.एम.एस. तसेच एम.बी.ए. (Integrated) व एम.सी.ए, (Integrated) या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रकीया राबविणे बाबत.

**महोदय / महोदया,**

आपणास विदितच आहे की, सद्यस्थितीत कोरोना(कोवीड-१९) च्या पार्श्वभूमिवर राज्यातील शैक्षणिक संस्था बंद आहेत. शासन पत्र क्र.संकिर्ण-२०२०/प्र.क्र.१२३/विशि-३,दि.०८/०५/२०२०नुसार शैक्षणिक वर्ष प्रथम वर्ष सोडून उर्वरित अभ्यासक्रम ०१ऑगस्ट,२०२०पासूनव प्रथम वर्ष ०१ सप्टेंबर,२०२०पासून सुरु झाले आहे. सध्या आपल्या राज्यात कोरोना रुग्णांची वाढ होतांना दिसून येते आहे. यात भविष्यात सुधारणा होत गेली तरी राज्यातील काही भागात१००टक्के कोराना संपेल याची खात्री देता येत नाही. या पार्श्वभूमीवर सद्यस्थितीत कोरोना (कोवीड-१९) ची स्थिति लक्षात घेता, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर विद्यार्थ्यांचे आरोग्य हित लक्षात घेता, पदवी आणि पदव्युत्तर (बी.बी.ए.,बी.सी.ए.,बी.एम.एस, बी.एम.एस.(ई-कॉमर्स), एम.एम.एस. तसेच एम.बी.ए. (Integrated) व एम.सी.ए, (Integrated) या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया ही महाविद्यालये आणि विद्यापीठातील प्रशाळांनी आपल्या स्तरावर राबवावी व शासनाने निर्गमित केलेल्या संवर्गानुसार विद्यार्थ्यांचे प्रवेश गुणवत्तेच्या आधारावर निश्चित करावे.

वरील प्रमाणे प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादी मा.प्राचार्य /मा.संचालक यांच्या सही शिक्यासह विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पात्रता अर्ज सादर करते वेळी प्रवेश पात्रता विभागात सादर करावी.

तरी सदर बाब आपल्या अधिनिस्थ असलेले अध्यापक,प्राध्यापक तसेच महाविद्यालयाचे कार्यालयीन अधिकारी/ कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावी ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत /- XXX
सहा.कुलसचिवांकरिता
अभ्यासमंडळ व प्रवेश पात्रता विभाग

**प्रत माहिती साठी :-**

१) मा.कुलगुरु कार्यालय, कबचौ उमवि.जळगांव.

२) मा.प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौ उमवि.जळगांव.

३) मा.प्र.वित्त व लेखाधिकारी,कबचौ उमवि जळगांव.

४) मा.समन्वयक, ई-सुविधा कक्ष,कबचौ उमवि जळगांव.

☎ :- (९१) ०२५७ - २२५७२९२, २२५७४०८, २२५७२९७, वेबसाईट :- www.nmu.ac.in, ई-मेल :- registrar@nmu.ac.in

फॅक्स क्रं:- (९१) ०२५७- २२५८४०३,४०६ प्रवेश पात्रता विभाग, पत्र पेटी क्रं. ८०, क.ब.चौधरी उमविनगर, जळगांव -४२५००१